# चोला आणि आयशर पोलारिसच्या भागीदारीची घोषणा

मुंबई। प्रतिनिधी

चोलामंडलम इन्वेस्टमेंट आणि फायनान्स कंपनी लिमिटेड (चोला) तसेच आयशर पोलारिस प्रा. लि. यांच्यात धोरणात्मक करार झाला असून त्यांनी त्यांच्या ग्राहकांकरिता ऑटो रिटेल फायनान्स उपलब्ध करून दिला आहे. आयशर पोलारिस प्रा. लि. ने अलीकडेच मल्टीक्स लॉन्च केली. ही भारतातील पहिली पर्सनल युटीलिटी वेहीकल असून 'स्वतंत्र व्यावसायिक' हे त्यांचे लक्ष्य आहे. या भागीदाराच्या माध्यमातून भारतातील मल्टीक्सच्या नियोजित ग्राहकांना सोयीचे, त्वरित आणि सोपे आकर्षक वाहन वित्त पर्याय पुरविण्याचा चोलाचा उद्देश आहे.

मल्टीक्सच्या वाहन बांधणी मागचा उद्देश हा एकाच वाहनाचा कुटुंब, व्यापारी वापर आणि ग्राहकासाठी शक्ती निर्मिती असे एकात ३ फायदे समाविष्ट आहेत. या सेगमेंटमध्ये वृद्धी व्हावी या उद्देशाने मल्टीक्सचे लॉन्च ३० शहरांत करण्याचे ठरवले आहे. वाहनांची डिलिव्हरी ऑगस्ट २०१५ पासून सुरू होणार आहे.

आयशर पोलारिस प्रा. लि.सोबत करारात प्रवेश केल्यावर चोला मल्टीक्स वित्तसाह्यक बनला आहे. यासोबत मल्टीक्ससाठी ऑटो रिटेल फायनान्स चोलाच्या ५३४ शाखांमध्ये आणि भारतभर मल्टीक्सच्या नियोजित डिलरशीप ठिकाणी उपलब्ध होणार आहे.

या भागीदारीविषयी बोलताना, आयशर पोलारिस प्रा. लि. चे प्रमुख कार्यकारी अधिकारी (सीईओ) श्री. राधेश सी वर्मा म्हणाले की, आम्ही मल्टीक्सचे डिझाईन घडवले आणि हिची संपूर्ण इकोसिस्टीम स्वतंत्र व्यावसायिकाच्या अनोख्या गरजा लक्षात घेऊन तयार करण्यात आली आहे. त्यामुळे इतर चारचाकी पर्याय एखाद्याला कमी महत्त्वाचे वाटतील. चोलामंडलम इन्वेस्टमेंट अँड फायनान्स कंपनी लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक वेल्लायन सुबय्या म्हणाले की, आमच्या ग्राहकांना चांगल्या आयुष्यात प्रवेश करता यावा यासाठी उत्तम वित्तसाह्य पर्याय पुरविण्याचा आमचा उद्देश आहे.